# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.०८/२०२१

| | |
|---|---|
| डॉ.महादेव सुखदेव सुर्यवंशी<br>५१/४ प्लॉट क्र.०८,लक्ष्मीपार्क,<br>जयसिंगपूर, ता.शिरोळ,जि.कोल्हापूर. | तक्रार अर्जदार |

**विरूध्द्**

| | |
|---|---|
| १. जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर, ता.शिरोळ<br>जि.कोल्हापूर.<br><br>२. अनेकांत एज्युकेशन सोसायटी, बारामती,<br>c/o. टी.सी.कॉलेज, बारामती, जि.पुणे. | वि.प. |

अनेकांत एज्युकेशन सोसायटी, बारामती, जि.पुणे या शिक्षण संस्थेचे जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांचेकडील शिक्षक डॉ.महादेव सुखदेव सुर्यवंशी यांच्या तक्रार निवारण समितीकडील दि.१३/०९/२०२१ रोजीच्या तक्रार अर्जाबाबत मा.पीठासीन अधिकारी, विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे यांचेकडील दाखल अपिल क्रं.११/२०२२(एस)(जीसी) वरील मा.पीठासीन अधिकारी, विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे यांनी दि.३१/०७/२०२४ रोजी दिलेल्या निर्देशानुसार समितीसमोर सुनावणी घेण्यात आली. अर्जामध्ये तक्रारदार यांनी नमूद केलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.

**तक्रारीचे स्वरूपः**

शिवाजी विद्यापीठाने एसयु./संलग्नता/स्थान टि-१/एस.डी.एम/२४३६ दिनांक १५ डिसेंबर २०२० नं.३२४ या पत्राने सर्व महाविद्यालयांना सहयोगी प्राध्यापक (स्टेज-४) चे प्रस्ताव दि.३१/०१/२०२१ पर्यंत कार्यालयाकडे पाठवावे असे कळविण्यात आल्यामुळे दि.२७ जानेवारी २०२१ रोजी मा.प्राचार्यांमार्फत विद्यापीठाकडे प्रस्ताव दाखल केला होता. दि.२४/०२/२०२१ रोजी माझी मुलाखत झाली. दि.२१ मार्च २०२१ च्या पत्राने मुलाखती दिनांकापासून कॅसचे लाभ मिळणार असलेचे विद्यापीठाने Ref No.su/Affi/placement/mane/3433 Date 19 march 2021/No.619 च्या संदर्भिय पत्राने मला कळविण्यात आले. पण युजीसीने २१ नोव्हेंबर २०१४ च्या नोटीसीने कळविलेनुसार दिल्ली हायकोर्टाच्या दि.०८ मार्च २०२१ च्या निर्णयानुसार, तसेच (NFGE) प्रहार विद्यार्थी संघटनेला युजीसीने कळविलेल्या F.No.24/02/2018(PS/MISE) दि.२१ फेब्रुवारी २०२१

च्या पत्रानुसार मुलाखत दिनांकापासून नाही तर उमेदवार पात्र दिनांकापासून कॅस लाभ देण्यात यावेत. त्यानुसार माझी पात्रता दिनांक दि.०१/०९/२०१९ ही असल्यामुळे मला दि.०१/०९/२०१९ पासून कॅसचे लाभ मिळावेत ही विनंती.

**संस्थेचा अभिप्राय :**

कॅस शिवाजी विद्यापीठाचे पत्र दि.१५/१२/२०२० नुसार महाविद्यालयातील सहा.प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक पदोन्नती देण्यास पात्र होते. त्यांचे प्रस्ताव विहित वेळेपुर्वी योग्य त्या कागदपत्र व शे-यासह शिवाजी विद्यापीठास सादर केलेले होते. त्यानुसार दि.२४/०२/२०२१ रोजी सदर प्राध्यापकांच्या मुलाखतीवेळी प्राचार्य व संस्था प्रतिनिधी उपस्थित होते. महाविद्यालयाकडून जी कार्यवाही अपेक्षित होती ती वेळेत योग्य पध्दतीने पुर्ण केली आहे.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

सदर तक्रारीच्या संदर्भात महाविद्यालयाशी आतापर्यंत कोणताही प्रकारचे पत्रव्यवहार संदर्भात प्राध्यापकाकडून झालेला नाही.

**समितीची निरिक्षणे :**

दोन्ही पक्षांना आपले म्हणणे मांडण्याची संधी दिलेली होती. तथापि दि.२०/०९/२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्राचार्य, जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर यांनी "सदर तक्रारीत नमूद केलेली तक्रार ही महाविद्यालय व संस्थेच्या अधिकारातील बाब नाही तरी, सदर तक्रारीवर मा.अध्यक्ष, तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी जो निर्णय घेतील त्याप्रमाणे आम्ही पुढील कार्यवाही करण्यात येईल, कृपया याची नोंद घ्यावी ही नम्र विनंती." असे पत्र हया समितीस दिलेले आहे. 'या पत्रावरून हे स्पष्ट दिसून येते की, गैरअर्जदारांना याप्रकरणी आपले म्हणणे मांडावयाचे नाही आणि त्यांनी ही समिती जो निर्णय देईल तो त्यांना मान्य असेल व त्यानुसार पुढील कार्यवाही करणेत येईल असे लिहून दिलेले आहे'.

प्रस्तुत प्रकरणी तक्रारदाराने दाखल केलेल्या कागदपत्रांवरून असे दिसते की, विद्यापीठ अनुदान आयोगाने असे स्पष्ट निर्गमित केले आहे की, बढतीच्या संदर्भात शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारयांच्या बाबतीत ज्या तारखेला त्यानी बढतीच्या पदाची अर्हता प्राप्त केली असेल त्या तारखेपासून त्यांना बढतीचे लाभ देण्यात यावेत. याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी परिपत्रक निर्गमित केलेली आहेत आणि सर्वात अलिकडचे परिपत्रक दि. ०६/०६/२०२४ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाने निर्गमित केलेले आहे. त्याची प्रत याकामी दाखल केली आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या याचिका क्रमांक

(सिव्हिल) १५२५/२०१९ गंभिरदन के. गढवी विरूध्द स्टेट ऑफ गुजरात या प्रकरणातील दि. ०३/०३/२०२२ रोजीच्या निकालात हे स्पष्ट नमूद केले आहे की, राज्य सरकार, विद्यापीठ अनुदान आयोग यांचेवर युजीसी नियम बंधनकारक आहेत. या नियमाच्या उद्देशाविरूध्द राज्य सरकारने काही सूचना/परिपत्रके निर्गमित केलेली असतील तर ती सर्व अनाधिकाराच्या (Ultra Vires) आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या Any State legislation which stultifies or sets at naught an enactment validly made by Parliament would be wholly ultra vires. ह्या निर्णयानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाचे सर्व मार्गदर्शक तत्वे, नियम बंधनकारक आहेत.

हे जरी खरे असले तरी एखाद्या कर्मचाऱ्यास बढती देणे आणि त्या बढतीचे लाभ त्याला पुर्वलक्षी प्रभावाने म्हणजेच त्याने अर्हता प्राप्त करण्याच्या तारखेपासून देणे यामध्ये सरकारवर वित्तीय बोजा पडण्याची शक्यता असते. मा.सर्वोच्च न्यायालयाने आपल्या त्री-सदस्यीय खंडपीठाच्या सिव्हील अपिल नंबर ५५२७ ते ५५४३/२०१३/एसएलपी नंबर १८७६६ ते १८७८२/२०१० जगदिश प्रसाद शर्मा व इतर विरूध्द् बिहार सरकार व इतर या सिव्हील अपिलातील दि.१७ जुलै २०१३ च्या एकत्रीत न्यायनिर्णयामध्ये असे स्पष्टपणे म्हटलेले आहे की, विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशींमुळे राज्य सरकारवर वित्तीय बोजा पडणार असेल आणि इतर परिणाम होणार असतील तर अशा प्रकरणांमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशी आपोआप (Automatically) लागू पडणार नाहीत आणि अशा बाबतीत राज्य सरकारांनी सर्वोतोपरी विचार करून निर्णय घ्यावा. हा निकाल भारताचे तत्कालीन सरन्यायाधीश सदस्य असणा-या त्री-सदस्यीय खंडपीठाने पारित केलेला आहे. सिव्हील अपिल क्रमांक ५०३७/२०२२ डॉ.जे विजयन विरूध्द् केरळा सरकार व इतर या दि.०२/०८/२०२२ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या व्द्री-सदस्यीय खंडपीठाने या निर्णयावर भिस्त ठेवून असे म्हटले आहे की, उपरोक्त मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा अवलंब करून राज्य सरकारे ही विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशी मान्य करण्यास किंवा अवलंबिण्यास बांधील नाहीत. तक्रारदाराने आधार घेतलेल्या याचिका क्रमांक १५२५/२०१९ गंभीरदन के. गढवी विरूध्द् गुजरात सरकार व इतर या निकालपत्रात मा.सर्वोच्च न्यायालयाने जगदिश प्रसाद शर्मा विरूध्द् बिहार सरकार व इतर सर्व संलग्न प्रकरणे या निकालाचा उल्लेख केलेला दिसत नाही. ही बाब स्पष्ट आहे की, जगदिश प्रसाद शर्मा व इतर या प्रकरणात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशींचा राज्य सरकारवर पडणारा वित्तीय बोजा हा प्रश्न निगडीत होता. त्या प्रकरणात केंद्र सरकारने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सचिवांना केंद्रीय विद्यापीठांच्या, महाविद्यालयांच्या आणि अभिमत विद्यापीठांच्या शिक्षक व समकक्ष पदांवरील कार्यरत इसम यांच्या वेतन पुर्नरचनेबद्दल एक योजना सुचविलेली होती. तथापि त्या योजनेमध्ये राज्य सरकारांना ती योजना तिच्या विविध घटकांनी भरलेल्या स्वरूपांमध्ये मान्य करणे अथवा अमान्य करण्याचा पर्याय

दिलेला होता. यावरून मा.सर्वोच्च न्यायालयाने जगदिश प्रसाद शर्मा व इतर या प्रकरणात वर नमूद केलेल्या प्रकरणात असे म्हटले होते की, वित्तीय बाबींचा साधक-बाधक विचार केल्याविना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशी या राज्य सरकारांवर बंधनकारक असणार नाहीत.

या समितीच्या नम्र मतानुसार कायद्याची ही परिस्थिती स्पष्ट होते की, ज्या ठिकाणी राज्य सरकारांवर वित्तीय बोजा पडतो, त्या ठिकाणी राज्य सरकारांवर विद्यापीठ अनुदान आयोगाच्या शिफारशी आपोआप स्विकारणे बंधनकारक नसते आणि त्या ठिकाणी राज्य सरकारांनी साधक-बाधक विचार करून निर्णय घ्यायचा असतो आणि असा निर्णय राज्य सरकारांने दि.१० मे २०१९ रोजीच्या Misc-2018/C.A.56/18/Uni -1 हया शासन निर्णयाद्वारे घेतलेला दिसतो व त्यायोगे बढतीस पात्र प्राध्यापकांना त्यांच्या मुलाखतीच्या दिनांकापासून बढतीचे लाभ द्यावेत असा निर्णय राज्य सरकारांनी घेतलेला दिसतो. त्यामुळे महाराष्ट्र राज्य सरकारने वर नमुद केलेल्या शासन निर्णयामध्ये बढतीचे लाभ मुलाखतीच्या दिवसापासून देय होतात असा निर्णय घेतलेला आहे आणि तो निर्णय मा.सर्वोच्च न्यायालयाच्या जगदिश प्रसाद शर्मा या निर्णयाच्या निकालानुसार योग्य आहे. त्यामुळे तक्रारदाराने दाखल केलेल्या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या याचिका क्रं.१५२५/२०१९ या न्यायनिर्णयाचा तक्रारदाराला उपयोग होवू शकत नाही असे या समितीचे नम्र मत आहे.

तक्रारदारातर्फे मुंबई उच्च न्यायालयाच्या याचिका क्रमांक ५७९/२०२१, मनोहर व्ही लोखंडे विरूध्द युनियन ऑफ इंडीया व इतर या प्रकरणातील दि.०१/०२/२०२४ या निकालाचा आधार घेण्यात आला. त्या प्रकरणात याचिकाकर्त्याने असोसिएट प्रोफेसर या पदावर बढती मिळणेकरीता न्युनतम अर्हता प्राप्त केल्या तारखेपासून सदर पदाचे लाभ त्यास मिळावेत असा अर्ज केला होता. त्या प्रकरणी निवड समितीने दि.१७/०८/२०२० रोजी तक्रारदारास प्राध्यापक स्टेज ५ या पदावर बढती दिली होती आणि त्यात हे स्पष्ट नमूद केले की, सदरची बढती ही त्यास बढती देवू केल्या तारखेपासून लागू होईल, ना की तक्रारदाराने बढतीकरीता अर्हता प्राप्त केल्या तारखेपासून. त्या प्रकरणातील विविक्षीत बाबींवरून मा.उच्च न्यायालयाने तक्रारदाराचा बढतीचा आदेश अंशतः खारीज केला आणि विद्यापीठाला तक्रारदारास बढतीचे लाभ त्या निकालात दिलेल्या तत्वास आधारून पुर्नविचार करून द्यावेत असा आदेश पारित केला. त्या प्रकरणातील बाबी आणि या प्रकरणातील बाबी या वेगळया असल्याने त्या निकालाचा तक्रारदाराला काही उपयोग होणार नाही असे या समितीचे नम्र मत आहे.

सबब मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय विचारात घेता तक्रारदार यांनी केलेली मागणी शासननिर्णयानुसार ग्राहय धरता येणार नाही. असे या समितीचे नम्र मत आहे.

## आदेश

तक्रार खारीज करण्यात येत आहे.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

दिनांक : 16 OCT 2024

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.एस.महाजन )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)